ठेवावे.

• छिद्रे पाडून झाल्यावर गादीवाफा ओलवून वाफसा आल्यानंतर लागवड करावी.

• रोपे लावताना रोप व्यवस्थित दाबून, पेपरला चिकटणार नाही याची काळजी घेऊन लावावे. जेणेकरुन रोपांची मर होणार नाही. अशा पध्दतीने एकरी सुमारे ७२५० रोपे लागतात.

• खत व्यवस्थापन-

लागवडीपुर्वी ५०:५०:५० किलो नत्र, स्फुरद, पालाश प्रति हेक्टरी दयावे व लागवडीनंतर एक महिन्याने ५० किलो प्रति हेक्टरी नत्र खताची मात्र दयावी. माती परीक्षण अहवालानुसार खत नियोजन करावे. ठिंबक मार्फत प्रति एकर एका दिवसाआड खत देण्याचे प्रमाण व खताची एकूण मात्रा (एकरी)

• ठिबक सिंचनातून दयावयाची विद्राव्य खत मात्रा-

टिप – जमिनीच्या प्रतिनुसार व माती परीक्षण अहवालानुसार खतांची मात्रा दयावी.

• छाटणी (प्रुनिंग) –

वेलीची वाढ एकसारखी होऊन पानाचा आकार मोठा, कीड व रोगास वेलाची प्रतिकार क्षमता वाढविण्यासाठी, नको असलेला वेलीचा भाग म्हणजे मध्यभागचा शेंडा अनावश्यक बगल फुट छाटून टाकणे गरजेचे असते. यामुळे फळांचा आकार, रंग, चव, आकर्षकपणा व वजन यामधे फायदेशीर बदल होतो.

• पाणी व्यवस्थापन –

मल्चिंग वरती लागवड असेल तर ठिंबकच्या सहाय्याने जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याचे नियोजन करावे. फळधारणेनंतर व फळ वाढेपर्यंत एकसारख्या प्रमाणात पाणी दयावे. फळ परिपक्वतेवेळी पाण्याचे प्रमाण कमी करावे त्यामुळे फळामधील सारखरेचे प्रमाण व गराचे प्रमाण उत्तम राहते.

• पिकाचा कालावधी –

८० ते १०० दिवस

• फळाची काढणी व उत्पादन –

खरबूजाचे फळ पिकू लागल्यावर फळांचा मधूर वास येतो. फळांच्या सालीचा रंग बदलतो. फळे जास्त जाळीदार होताता जाळीच्या मधील जागा पिवळसर होते.

सुधारीत पध्दतीने लागवड केल्यास २० ते २५ टन प्रति हेक्टरी खरबूजाचे उत्पादन मिळते.

कृषि विज्ञान केंद्र बारामतीने सन २०११ – १२ पासून खरबूज लागवडीमध्ये रोपवाटीका मल्चिंग, बेडवर लागवड, ठिबकाद्वारे पाणी व खत व्यवस्थापन या पध्दतींचा वापर करुन शेतक-यांच्या क्षेत्रावर खरबूजाचे एकरी १० ते १२ टन इतके उत्पादन घेतले आहे.

लेख संकलन

श्री. यशवंत जगदाळे
विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या),
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

डॉ. सय्यद शाकीर अली
प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ,
कृषि विज्ञान केंद्र, बारामती

Agricultural Development Trust Baramati

खरबूज उत्पादन तंत्रज्ञान

निर्मिती अर्थसहाय्य :

प्रकल्प संचालक आत्मा, पुणे

कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५
फोन :०२०– २५५३०४३१
E-mail : pdatmapune@gmail.com

तांत्रिक लेखन व प्रकाशन:

कृषि विज्ञान केंद्र, बारामती

माळेगांव खुर्द, बारामती, पुणे – ४१३ ११
फोन :०२११२-२५५२०७, २५५२२७
E-mail:kvkbmt@yahoo.com
Web: www.kvkbaramati.com

खरबूज उत्पादन तंत्रज्ञान

रेताड, मध्यम काळी व उत्तम निच-याची जमीन निवडवी. जमीनचा सामू ६.५ ते ७ असावा. चोपण व पाणी धरुन ठेवणा-या जमीनीत हे पीक घेऊ नये. भारी जमीनीत पिकांना नियमित पाणी दिले नाही तर फळे तडकतात. खरबूज हे प्रत्येकाला आवडणारे फळ आहे. खरबूज या पिकाची लागवड पूर्वी फक्त नदीच्या पात्रातच होत होती. मात्र आता या पिकाची लागवड व्यापारी तत्वावर खूप प्रमाणात केली जात आहे.

उन्हाळयात तहान भागविण्याठी सर मधुर फळांचा उपयोग केला जातो. मनाला शांती व उन्हाळयात शरीराला थंडावा व दुष्काळी भागात येणारे पीक म्हणूनही या पिकाला ओळखले जाते.

• जमीन व हवामान-

या पिकाला उष्ण आणि कोरडे हवामान मानवते म्हणून या पिकाची लागवड उन्हाळयात करतात. वेलीच्या चांगल्या वाढीसाठी २४-२६ अंश सेल्सिअस तापमान उपयुक्त आहे.

• सुधारीत जाती-

महात्मा फुले कषि विद्यापीठाने पुसा सरबती, हरामधू, पंजाब सुनहरी व दुर्गापूरा मधू या जाती शिफारशीत केल्या आहेत. तसेच खाजगी कंपनीच्या कुंदन, बॉबी, मृदुला या जातीची लागवड ही ब-याच प्रमाणात केली जाते. एकरी ३५०-४०० ग्रॅम बियाणे लागते.

• रोपवाटिका व्यवस्थापन-

यापूर्वी खरबूजाची लागवड थेट बियाणे टाकून केली जात होती परंतु सध्याच्या प्रचलित पध्दतीनूसार प्लॅस्टिक ट्रे मध्ये (**प्रो ट्रे**) वाढविलेल्या रोपांची पुर्नलागवड केली जाते. यामुळे वेलांचे योग्य प्रमाण, मजूर, पाणी आणि इतर निविष्ठांवर होणार खर्च वाचतो. आणि वेळेचीही बचत होते.

• रोपे तयार करणेसाठी साधारणतः ९८ कप्पे असलेला प्रो ट्रे वापरतात. यामध्ये कोकोपीट भरुन बियाणे लागवड केली जाते.

• खरबजासाठी १.५ ते २ किलो बियाणे प्रति हेक्टरी केली जाते.

• बियाणे लागवडीपूर्वी कॅप्टन किंवा कार्बेन्डेझिम २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बियाणास चोळावे व नंतर लागवड करावी व पाणी घावे.

• लागवड केल्यास नंतर ८-१० ट्रे एकावर एक ठेवून काळया पॉलीथीन पेपरने झाकून घ्यावेत. झाकल्यामुळे उबदारपणा टिकून रहातो. यामुळे "बी" लवकर उगवून निघते.

• रोपे उगवून आाल्यानंतर ३-४ दिवसानंतर पेपर काढावा व ट्रे खाली उतरवून ठेवावेत.

• रोपे सडू नयेत म्हणून पेरणीनंतर दहाव्या दिवशी कॉपर ऑक्झीक्लोराईड किंवा कॉपर हायड्रॉक्साईडची दोन ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी.

• नागअळी व रसशोषक किंडीचा प्रार्दुभाव होऊ नये म्हणून ट्रायझोफॉस व इमिडॅक्लोप्रीड ०.५ मिली/लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

• १४ ते १६ दिवसात (पहिले फुटवा फुटल्यानंतर) रोपांची पुर्नलागवड करावी.

• खरबूजाची लागवड १.५/१ मीटर अंतरावर किंवा १.५/०.५ मीटर अंरतरावर करावी.

• लागवडीचा हंगाम –

उन्हाळा- जानेवारी ते मार्च, पावसाळा- जून ते ऑक्टोबर

लागवडीसाठी ठिबक सिंचन पध्दत

साधारणतः सात फुटावर लॅटरल असावी. इनलाईन ड्रिनी १.५ फूटावर असावा या पध्दतीमध्ये चोक अप होण्याचा त्रास नसतो. ठिंबक सिंचनासाठी ३० से.मी च्या अनंरावर इमीटर (ठिंबक) असलेल्या इपलाईन लॅट्ररल्स (दोन लिटर प्रति तास क्षमतेच्या) वापराव्यात फळधारणेनंतर एक सारख्या प्रमाणात पाणी दयावे.

• सिल्व्हर मल्चिंग व पॉलीप्रॉपीलीन नॉन ओव्हन पेपरचा वापर-

गादीवाफयावर ठिबक अंथरल्यावर खरबूज लागवडीपूर्वी १.२५ मीटर रुंद आणि ४०० मीटर लांब प्रति रोल (पेपराची जाडी ३० मायक्रॉन) मल्चिंग पेपर अंथरावा.

यामुळे जमीनीचे तापमान, आर्द्रता अनुकूल राहून पांढ-या मुळांची वाढ उत्तम होते. पाण्याची बचत, तणनियंत्रण, खतांची बचत तसेच काहीशा प्रमाणात किंडींचे नियंत्रण होते. एकरी पेपरचे ४-५ रोल लागतात.

• लागवडीचे तंत्रः

• लागवडीसाठी ७५ सेमी रुंद आणि १५ सेमी उंच गादी वाफे तयार करावेत.

• लागवडीपूर्वी ५०:५०:५० किलो नत्र, स्फरद, पालाश प्रति हेक्टर व लागवडी नंतर एक महिन्याने ५० किलो नत्र प्रति हेक्टर मात्रा घ्यावी.

• बेसल डोस मध्ये एकरी ५ टन शेणखत अ ५० किलो डीएपी + ५० किलो १०.२६.२६ + २०० किलो निबोळी पेंड + १० किलो झिंक सल्फेट मिसळावे.

• दोन गादी वाप-यावर वरचा माथा ७५ सेमी असावा. वाप-याच्या मधोमध लॅटरल टाकून यावर ४ फुट रुंदीचा मल्चिंग पेपर अंथरुण दोन्ही बाजूंनी पेपरवर माती झाकावी. जेणेकरुन पेपर वा-यामुळे फाटणार नाही.

• मल्चींग पेपर अंथरल्यानंतर दोन इंची पाईपच्या तुकडयाच्या सहाय्याने ड्रिपरच्या दोन्ही बाजुंना १० सेमी अंतरावर छिद्र पाडावीत.

• ड्रिप लाईनच्या एकाच बाजूच्या दोन छिद्रामधील अंतर १.५ फुट